**ठळक बातम्या**

- छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती सर्वत्र उत्साही वातावरणात साजरी
- गेल्या वर्षी नैसर्गिक संकटांचा फटका बसलेल्या ५ राज्यांना केंद्र सरकारकडून एक हजार ५५४ कोटी रुपयांहून जास्त अर्थसहाय्य मंजूर
- देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेश कुमार यांनी पदभार स्वीकारला
- नवव्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात

**आणि**

- ज्येष्ठ क्रिकेटपटू आणि मार्गदर्शक मिलिंद रेगे यांचं निधन

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे. यानिमित्त ठिकठिकाणी भव्य मिरवणुका, शोभायात्रा, व्याख्यानं, चित्र आणि शस्त्र प्रदर्शनं इत्यादी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मिरवणुका आणि पदयात्रांमधे शिवकाळ साकारणाऱ्या वेशभूषा तसंच कसरत करतब दाखवणाऱ्या कवायती लक्ष वेधून घेत आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं आहे. शिवाजी महाराज यांच्या कार्यातून एक बलशाली, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारत घडवण्यासाठी प्रेरणा मिळत असल्याची भावना त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशातून व्यक्त केली आहे.

नवी दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर शिवजयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ठिकठिकाणी जय शिवाजी - जय भारत पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं असून त्यात युवावर्ग मोठ्या संख्येने सहभागी होत आहे.

राज्यपाल सी. पी राधाकृष्णन यांनी मुंबईत शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं.

शिवाजी महाराजांचं जन्मस्थळ किल्ले शिवनेरीवर शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यावेळी उपस्थित होते. पुण्यात केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविय तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जय शिवाजी - जय भारत पदयात्रा काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज पराक्रमी राजा तसंच उत्कृष्ट शासक आणि व्यवस्थापन गुरु होते, असं फडणवीस यावेळी म्हणाले....

**होल्ड – बाईट - फडणवीस**

त्यानंतर पुण्याजवळ आंबेगाव इथं उभारण्यात आलेल्या शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचं लोकार्पण या मान्यवरांच्या उपस्थितीत झालं.

राज्यात सर्वत्र शिवजयंती विविध कार्यक्रमांनी साजरी होत आहे. केंद्रसरकारच्या ‘जय शिवाजी - जय भारत’ पदयात्रेचं आयोजन जिल्ह्याजिल्ह्यात करण्यात आलं असून उच्च पदस्थ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि युवावर्ग मोठ्या संख्येनं त्यात सहभागी झाला आहे

**नागपूरमधे** पालकमंत्री चन्द्रशेखर बावनकुळे यांनी या पदयात्रेला हिरवा झेंडा दाखविला.**नाशिक** मधे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे जय शिवाजी जय भारत पदयात्रेत सहभागी झाले. **छत्रपती संभाजीनगरमध्ये** क्रांती चौक परिसरातून ‘जय

शिवाजी-जय भारत' पदयात्रा काढण्यात आली. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, यांच्या हस्ते शिव प्रतिमेचं पूजन करुन यात्रेला सुरुवात करण्यात आली.

**यवतमाळ** तसंच वाशिम इथं काढलेल्या पदयात्रेत नागरीक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**नांदेडमध्ये** "जय शिवाजी जय भारत" पदयात्रा काढण्यात आली. यावेळी भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचं वाचन करण्यात आलं.

**सोलापुरात** काल चार जणांनी हुतात्मा पुतळ्या समोर सलग १९ तास १९ मिनिटे, १९ सेकंद दांडपट्टा फिरवून शिवरायांना अभिवादन केलं.

**परभणीत** पोलिसांचा रूट मार्च काढण्यात आला. पोलिस दलातील सुसज्ज यंत्रणेतील वाहने, शस्त्र,पोलिस अधिकारी,कर्मचारी सहभागी झाले होते.

**सातार्‍यात** किल्ले अजिंक्यतारा परिसर काल रात्री हजारो मशालींनी उजळवून टाकला होता.

**रत्नागिरी, गडचिरोली, सांगली, धाराशिव, नंदुरबार, लातूर अकोला, तसंच सिंधुदुर्ग** जिल्ह्यात **मालवण** इथं जय शिवाजी जय भारत पदयात्रा निघाल्या त्याच्या बातम्या आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत.

**<><><><><>**

गेल्यावर्षी पूर, भूस्खलन, वादळे यांसारख्या नैसर्गिक संकटांना सामोरं जावं लागलेल्या पाच राज्यांना एक हजार ५५४ कोटी रुपयांहून अधिक मदत केंद्र सरकारनं मंजूर केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्च स्तरीय समितीनं ही मंजूर दिली असून हा निधी राष्ट्रीय आपत्ती निवारण कोष- NDRF च्या माध्यमातून दिला जाणार आहे.

आंध्र प्रदेशला ६०८ कोटी रुपये, नागालँडला १७० कोटी रुपये ओदिशासाठी २५५ कोटी रुपये, तेलंगणासाठी २३१ कोटी रुपये, तर त्रिपुरा राज्यासाठी २८८ कोटी रुपयांचा निधी देणार असल्याचं गृहमंत्रालयानं सांगितलं. ही अतिरीक्त मदत केंद्रानं याआधी त्या राज्यांना दिलेल्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या व्यतिरीक्त असल्याचंही गृहमंत्रालयानं सांगितलं.

**<><><><>**

माध्यमांमध्ये महत्त्वाच्या पदांवर काम करणाऱ्या व्यक्तींनी कोणतंही विधान, बातम्या किंवा मतं प्रकाशित करण्यापूर्वी खबरदारी घ्यायला हवी, असं सर्वोच्च न्यायालयाने बजावलं आहे. बिड अँड हॅमर या कंपनीमार्फत लिलाव करण्यात येणाऱ्या काही चित्रांच्या सत्यतेवर बदनामीकारक मजकूर प्रकाशित केल्याचा आरोप एका इंग्रजी दैनिकावर करण्यात आला होता. या दैनिकाचे संपादक तसंच इतर पत्रकारांविरुद्ध मानहानीचा खटला दाखल करण्यात आला होता. या खटल्यावर आज सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणी दरम्यान न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवलं आहे. जनमत घडवण्यात माध्यमं निर्णायक भूमिका बजावतात, त्यामुळे बातम्या जबाबदारीने देणं आवश्यक आहे. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार हा सर्वोपरि अधिकार नाही, हे न्यायालयाने यावेळी अधोरेखित केलं.

**<><><><>**

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेश कुमार यांनी आज पदभार स्वीकारला. राजीव कुमार यांचा निवडणूक आयोगाच्या प्रमुखपदाचा कार्यकाळ संपल्यामुळे ज्ञानेश कुमार यांची नियुक्ती करण्यात आली. ज्ञानेश कुमार यांनी यापूर्वी संसदीय कामकाज मंत्रालयात सचिवपदाची जबाबदारी सांभाळली होती.

**<><><><>**

दिल्ली विधानसभेतल्या भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक आज संध्याकाळी नवी दिल्लीत होणार आहे. पक्षाचे नवनिर्वाचित आमदार आणि वरिष्ठ नेते यात सहभागी होतील. ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद आणि ओ. पी. धनखड यांना या प्रक्रीयेसाठी पर्यवेक्षक नेमलं आहे. दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्याचं नाव या बैठकीतच निश्चित होईल, नव्या मुख्यमंत्र्याचा शपथविधी सोहळा उद्या रामलीला मैदानावर होणार आहे.

<><><><>

९व्या फ्लॅगशिप एशिया इकॉनॉमिक डायलॉगला २० फेब्रुवारी पासून पुण्यात सुरुवात होणार आहे. यात कृत्रिम बुद्धीमत्ता आणि ऑटोमेशन तसंच वातावरण बदलाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम या विषयावर सखोल चर्चा होणार आहे. या कार्यक्रमात भारत आणि जगभरातले राजकीय नेते, वरिष्ठ सनदी अधिकारी, धोरण कर्ते, उद्योग तज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ सहभागी होणार आहेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं आहे. २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान हा कार्यक्रम होणार आहे. फ्रॅगमेंटशन युगातली आर्थिक लवचिकता आणि पुरुत्थान ही यंदाच्या कार्यक्रमाची संकल्पना आहे.

<><><><>

आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यासाठी पणन महासंघानं तूर खरेदीसाठी १२ केंद्रांना मंजुरी दिली. नऊ केंद्रांवरून हमीभावानं तूर खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी तसंच प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया सुरू केल्याची माहिती जिल्हा पणन अधिकारी बी.आर. पाटील यांनी दिली.

२०२४-२५ हंगामासाठी तूर पिकाची ७ हजार ५५० प्रति क्विंटल दरानं १३ फेब्रुवारीपासून खरेदी प्रक्रिया सुरू झाली आहे. ९ केंद्रावरून शेतकऱ्यांची ऑनलाईन पद्धतीनं नोंदणी सुरू आहे.

<><><><>

नवव्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेतला सलामीचा सामना पाकिस्तान आणि न्यूझीलंड संघांत सुरू आहे. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या बिनबाद ३९ धावा झाल्या आहेत. दरम्यान, आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने पाकिस्तान आणि दुबईत खेळले जाणार आहेत. रोहीत शर्माच्या नेतृत्वातल्या भारतीय संघाचा पहिला सामना उद्या दुबईत बांग्लादेशविरुद्ध होणार आहे.

<><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत, नागपूर इथं सुरु असलेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबईचा पहिला डाव आज २७० धावांवर आटोपला. आकाश आनंदनं शतक झळकावत १०६ धावा केल्या. विदर्भातर्फे पार्थ रेखाडेनं ४ बळी घेतले. विदर्भाच्या दुसऱ्या डावात, शेवटची बातमी हाती आली तेव्हा ४ बाद ६५ धावा झाल्या होत्या.

अहमदाबाद इथं सुरु असलेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात केरळच्या पहिल्या डावातल्या ४५७ धावांना उत्तर देताना गुजरातनं दमदार सुरुवात केली. प्रियांक पांचाल आणि आर्य देसाई यांनी पहिल्या गड्यासाठी १३१ धावांची भागीदारी केली. आर्य देसाई ७३ धावांवर बाद झाला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा त्यांच्या १ बाद १४६ धावा झाल्या होत्या. प्रियांक पांचालनं ६८ धावा केल्या आहेत.

**<><><><><>**

मुंबई क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि मार्गदर्शक  मिलिंद रेगे यांचं आज हृदयविकाराच्या झटक्यानं मुंबईच्या खासगी रुग्णालयात निधन झालं. ते ७६ वर्षांचे होते. गेल्या रविवारी रेगे यांना रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केलं होतं.

मुंबई संघात अष्टपैलू खेळाडू म्हणून मिलिंद रेगे यांची ओळख होती. प्रथम श्रेणीतले ५२ सामने खेळणाऱ्या रेगे यांनी १२६ गडी  बाद केले होते. १९७० मध्ये मिलिंद रेगे यांनी मुंबई रणजी संघाचं कर्णधारपद भूषविलं होते. निवृत्तीनंतर रेगे यांनी मुंबई क्रिकेट संघटना- MCA चे  निवड समितीत सदस्य, मार्गदर्शक आणि निवड समितीचे अध्यक्ष अशा विविध पदांवर काम केलं होते. त्यांच्याच कार्यकाळात रणजीसाठी मुंबईच्या संघात सचिन तेंडुलकर याला प्रथम संधी मिळाली होती.

**//<><><><><>//**